



दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : १४५ ● पुणे ● शुक्रवार, दि. १८ एप्रिल २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





१०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जनता... 3





कचरा डेपोला विरोध करण्यासाठी प्रांताधिकारी... 4


## ठळक बातम्या

### १ लाखापर्यंत कॅशलेस उपचार करा

**मुंबई (आरंभ पर्व) :** राज्याचे आरोग्यमंत्रीप्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत आज शासकीय अधिकाऱ्यांची बैठक पार पडली असून या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्देश देण्यात आले आहेत. उपचाराअभावी रुग्णांना प्राण गमवावे लागू नयेत यासाठी अपघातग्रस्त रुग्णांना विविध योजनांमध्ये अंगीकृत असलेल्या रुग्णालयांत १ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार उपलब्ध करावेत, अशा सूचनाही आबिटकर यांनी दिल्या आहेत. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या कामकाजाच्या आढावा बैठकीत आरोग्यमंत्र्यांनी या सूचना दिल्या आहेत. पुण्यातील दीनानाथ रुग्णालयाने पैशांअभावी गर्भवती महिलेला उपचार नाकारल्याने तिचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात आरोग्य व्यवस्थेबाबत संतापाची लाट उसळली. या पार्श्वभूमीवर रुग्णालयांना चाप बसवणे आणि राज्यातील जनतेला योग्य दरात आणि तत्काळ उपचार मिळावेत, यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात, याबाबत चर्चा करण्यासाठी आज आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या नेतृत्वात आढावा बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं.

### रुग्णालयांकडून फक्त लूटमार सुरु

**पुणे (आरंभ पर्व) :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात घडलेल्या घटनेनंतर धर्मादाय रुग्णालयांच्या रुग्णसेवेवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. शहर आणि जिल्ह्यातील एकूण ५८ धर्मादाय रुग्णालयांपैकी २९ रुग्णालयांनी त्यांच्या निधीपेक्षा जास्त खर्च रुग्णांवर केला असून, २१ रुग्णालयांचा कोट्यवधी निधी शिल्लक राहिला आहे. ही रुग्णालये रुग्णांवर उपचारासाठी हात आखडता घेत आहेत. त्यामुळे या २१ रुग्णालयांना रुग्णांवर उपचार करण्यापेक्षा पैसाच अधिक प्रिय असल्याचे स्पष्ट झाले आहे. धर्मादाय योजनेअंतर्गत ज्या निर्धन रुग्णाचे वार्षिक उत्पन्न रुपये ८५ हजार इतके आहे. त्यांना १० टक्के राखीव खाटा व पूर्ण मोफत उपचार केले जातात. तर दुर्बल घटकांतील लाभार्थी ज्या रुग्णाचे वार्षिक उत्पन्न रुपये १ लाख ६० हजार इतके आहे, त्यांना १० टक्के राखीव खाटा व उपचाराच्या दरात ५० टक्के सवलत देण्यात येते. धर्मादाय आयुक्तालय कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार जानेवारी ते डिसेंबर २०२४ या एका वर्षात पुणे जिल्ह्यातील ८६ हजार ८२६ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. परंतु यामध्ये २१ मोठ्या हॉस्पिटलचा राखीव निधी मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिला आहे. शिवाय २९ रुग्णालयांनी त्यांच्याकडे शिल्लक असलेल्या निधीपेक्षा जास्त पैसा खर्च केला आहे. धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब आणि निर्धन रुग्णांवर मोफत उपचारांसाठी १० टक्के बेड राखीव ठेवण्याचा नियम आहे; पण सर्रास रुग्णालयांत याची माहिती दिली जात नाही. यामुळे गरीब व गरजू रुग्ण या योजनेपासून वंचित राहतात.

# चितळे बंधू यांच्या नावाची बनावट बाकरवडी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चितळे बंधू मिठाईवाले यांच्या “चितळे स्वीट होम” नावाची बनावट बाकरवडी बाजारात आली आली आहे. “चितळे स्वीट होम” यांनी चितळे बंधू मिठाईवाले यांचे अधिकृत ई मेल आयडी, कस्टमर केअर नंबर, मॅन्युफॅक्चरिंग डिटेल्स आणि कॉन्टॅक्ट डिटेल्स यांची माहिती बाकरवडीच्या पाकिटावर नोंदवण्यात आली आहे. ही बाकरवडी चितळे बंधू मिठाईवाले यांची असल्याचे भासवण्यात आली आहे. चितळे बंधू मिठाईवाले यांच्या नावाचा गैरवापर करुन फसवणूक ग्राहकांची फसवणूक होत असल्याचे समोर आलं आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून चितळे बंधू मिठाईवाले यांना बाकरवडीची बदल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त होत्या. या तक्रारींची दखल घेत बाजारात मिळणाऱ्या काही ठिकाणाहून “चितळे स्वीट होम” नावाने विक्रीस असणाऱ्या बाकरवडीचे पाकिटे खरेदी करण्यात आली.

‘चितळे स्वीट होम’ नावाने असणारे बाकरवडीची पाकिटे आणि आमच्या नियमीत तयार होणाऱ्या बाकरवडीच्या पाकिटांमध्ये तफावत दिसून आली. चितळे बंधू मिठाईवाले यांचा भोर तालुक्यातील मौजे रांजे येथे बाकरवडी तयार करण्याचा मुख्य प्लॉन्ट आहे. याशिवाय पर्वती इंडस्ट्रीयल, टिमवी कॉलनी मुकुंदनगर याठिकाणी देखील बाकरवडी तयार करण्याचे छोटे युनिटस् आहेत.

खरेदी केलेल्या पाकिटांची तपासणी केली असता बाकरवडीमध्ये तफावत असल्याचे आढळून आली. या पाकिटांवर चितळे बंधू मिठाईवाले यांचे अधिकृत ई मेल आयडी , कस्टमर केअर नंबर आणि वेबसाईट डिटेल्स हे पाकिटांच्या साईड पट्टीवर हुबेहुब छापले असल्याचे दिसून आली.

चितळे बंधू मिठाईवाले यांचे अधिकृत ई मेल आयडी, कस्टमर केअर नंबर, मॅन्युफॅक्चरिंग डिटेल्स आणि कॉन्टॅक्ट डिटेल्स यांची माहिती स्वतःचे प्रोडक्शन असलेल्या बाकरवडीच्या पाकिटावर नोंदवून चितळे बंधु मिठाईवाले यांच्या नावाचा गैरवापर करण्यात आल्याचे उघड झाला आहे. या प्रकरणी फसवणूक करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२), ३५०, ६६(सी), ६६ (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सूनच नाही तर सासूलाही करता येणार हिंसेविरोधात तक्रार

### हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

कुटुंबांमध्ये सासू-सुनेमध्ये होणारे वावविवाद, भांडण ही आपल्याकडील सामान्य बाब आहे. मात्र कधीकधी असे वाद विकोपाला जाऊन त्यातून गंभीर गुन्हे घडतात. काही कुटुंबांमध्ये सासू आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या छळामुळे सुनांकडून टोकाचं पाऊल उचलण्यासारखे प्रकारही घडतात. तर आता बदललेला काळ आणि कुटुंब व्यवस्थेत झालेल्या परिवर्तनानंतर काही सुनांकडून सासूचा छळ होत असल्याच्याही घटना समोर येत आहेत. दरम्यान, सुनांकडून छळ होणाऱ्या सासूला कायदेशीर दाद मागण्याचा, छळाविरोधात आवाज उठवण्याचा अधिकार आहे की नाही, असा प्रश्न मागच्या अनेक दिवसांपासून उपस्थित केला जात होता. या प्रश्नाचं उत्तर आता अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलं आहे. सासूसुद्धा कौटुंबिक हिंसेविरोधात दाद मागून केस दाखल करू शकते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने याबाबत दिलेल्या आपल्या ऐतिहासिक निर्णयामध्ये सांगितले की, कौटुंबिक हिंसाचार विरोधा कायदा हा केवळ सुनांच्या सुरक्षेपुरता मर्यादित नाही. सासूसुद्धा या कायद्यांतर्गत तक्रार नोंदवू शकते, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. एका सासूने तिच्या सुनेविरोधात कौटुंबिक हिंसाचाराप्रकरणी तक्रार नोंदवली होती, तर सुनेने याला आक्षेप घेत सासूविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

या सुनावणीवेळी सासू सुनेविरोधात अशा प्रकारची तक्रार नोंदवू शकते का? असा प्रश्न उपस्थित झाला. त्यावर सुनावणी करताना हायकोर्टाने त्याला परवानगी दिली. या प्रकरणात पीडित सासूने तिच्या सुनेविरोधात कौटुंबिक हिंसाचारविरोधी अधिनियम २००५ अन्वये तक्रार नोंदवू शकते, असे सांगितले. हा निर्णय न्यायमूर्ती आलोक माथूर यांनी जाहीर केला. त्यांनी लखनौमधील एका कनिष्ठ न्यायालयाने पीडित सासू आणि तिच्या कुटुंबीयांविरोधात बजावण्यात आलेले समन्स योग्य असल्याचा निर्णय दिला.



या प्रकरणात सासूने केलेल्या आरोपानुसार तिची सून तिच्या मुलावर आपल्या माहेरी येऊन राहण्यासाठी दवाब आणत होती. त्याशिवाय सदर सुनेने सासू आणि सासऱ्यांसोबत गैरवर्तन केल्याचा आणि खोट्या खटल्यामध्ये अडवण्याची धमकी दिल्याचाही आरोप सासूने केला आहे. दरम्यान, सासूच्या वतीने देण्यात आलेली ही तक्रार सुनेने नोंदवलेल्या हुंड्यासाठी छळ आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारीचा बदला घेण्यासाठी करण्यात आली होती, असा दावा सुनेच्या वकिलाने केला आहे. अखेरीस दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर अलाहाबाद हायकोर्टाने सासूने नोंदवलेली तक्रार ही प्राथमिक दृष्ट्या कौटुंबिक हिंसाचार कायद्यातील कलम १२ अंतर्गत येते असा निर्णय दिला. तसेच कनिष्ठ न्यायालयाने सुनेविरोधात बजावल्ले समन्स वैध ठरवले.

## राज्यात ८०० तर पुण्यात ५१ शाळा बोगस; तुमच्या मुलाची तर नाही ना?

**नीरा (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

राज्यामध्ये ८०० शाळा बोगस असल्याचे उघड झाले आहे. त्यातील १०० शाळांना कायमचे टाळे लावण्यात आले आहे. यात पुणे जिल्ह्यातही शिक्षण विभागाने पुणे महानगरपालिका व जिल्हा कार्यक्षेत्रातील ५१ शाळांवर अधिकृतपणे बोगसचा ठपका ठेवला आहे; पण शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते जिल्ह्यात किमान १०० च्या वर शाळा बोगस असाव्यात. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांचा शाळेत प्रवेश घेताना विचार करायला हवा, विशेषतः शाळा संस्थाचालकांच्या आमिषाला बळी न पडता शासनमान्यता असेल त्याच शाळेमध्ये पाल्याचा प्रवेश द्यावा. नाही तर पाल्याच्या भविष्यासह आपल्यालाही नाहक त्रास होऊ शकतो.

अनधिकृत शाळांमुळे पालकांची आर्थिक फसवणूक आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. शिक्षण विभागाकडून अनधिकृत शाळांबाबत अनेकदा सूचना दिल्या जातात. राज्यात अनधिकृतपणे सुरू असलेल्या सर्व शाळा लवकरच बंद करून तसा अहवाल सादर करण्यासंदर्भात शालेय शिक्षण आयुक्त यांनी याआधी आदेश दिले आहेत. त्याअनुषंगाने मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, पुणे जिल्ह्यात सुरू असलेल्या सर्व शाळा बंद करून सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे अधिकच्या शासन मान्यताप्राप्त शाळेत समायोजन करून तसा अहवाल शिक्षण उपसंचालक कार्यालयात सादर करायचा आहे.






# दिशाहीन मेळावे



उबाठा शिवसेनेचा निर्धार मेळावा नाशिकमध्ये पार पडला, अर्थात हा उबाठा शिवसेनेच्या प्रमुखांच्या भाषणांमध्ये गेल्या तीन-साडेतीन वर्षांपासून फारसे काही नावीन्यच शिल्लक न राहील्याने निर्धार मेळावा हा विनानिर्धारानेच पार पडल्याची नाराजीची चर्चा खुद्द उबाठा सेनेमधील शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे. पूर्वी शिवसेनेचा मेळावा कोठेही असो, शहरी भागात होवो अथवा ग्रामीण भागात होवो. मेळाव्यामध्ये शिवसैनिकांची गर्दी उत्स्फूर्त असायची, मैदानांमध्ये गर्दीचा उच्चांक करणारी असायची. दस्तुरखुद्द शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जेव्हा खुल्या पटांगणामध्ये बोलताना सुरुवातीलाच 'येथे जमलेल्या माझ्या तमाम शिवसैनिकांनो', अशी सुरुवात करायचे, त्यावेळी गगनभेदी जयघोषांच्या आरोळ्या होत असायच्या, शिवसेना जिंदाबाद, जय महाराष्ट्र या घोषणांनी आसमंत दणाणून निघायचा, पण हे सारे इतिहासजमा झाले आहे. शिवसेनाप्रमुखांचे पुत्र असणाऱ्या उद्धव ठाकरेंना बाळासाहेबांची शिवसेना वाढविण्यात यश तर आलेच नाही, पण शिवसेनेचा तो दरारा, रुबाब, शिवसैनिकांचे प्रेमही टिकविण्यास अपयश आले. शिवसेनाप्रमुखांच्या केवळ आदेशावर ज्यांनी रक्ताचे पाणी केले, स्वत:च्या घरादारांकडे, मुलाबाळांकडे अगदी संसाराकडे कानाडोळा करून ज्यांनी संघटना वाढविली, त्यांनाच संघटनेच्या कामकाजातून अलिप्तता स्वीकारण्यास भाग पाडण्यास उद्धवच्या नेतृत्वाने सुरुवात केल्यावर संघटनेच्या पडझडीला सुरुवात झाली आणि या गोष्टीला, आजच्या शिवसेनेच्या वाताहतीला दस्तुरखुद्द उद्धव ठाकरेच जबाबदार आहे. वारसा हा विचाराने आणि कर्तृत्वाने यायला लागतो, तरच त्या संघटनेची घोडदौड होते. शिवसेनाप्रमुखांचा वारसा केवळ मुलगा या नात्याने उद्धव ठाकरेंकडे आला, पण कर्तृत्व आणि विचारधारा, संघटनाबांधणी यात योगदान शून्य असल्याने तसेच निष्ठावंतांवर अन्याय केल्याने हा वारसा केवळ कागदोपत्रीच राहीला. त्यामुळेच शिवसेना संघटनेत फाटाफूट झाली. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली तब्बल ३९ आमदारांनी, विधान परिषदेच्या अनेक आमदारांनी, अधिकाधिक पदाधिकाऱ्यांनी, सर्वाधिक माजी नगरसेवकांनी आणि बाळासाहेबांवर प्रेम करणाऱ्या लाखो शिवसैनिकांनी शिवसेना उद्धव ठाकरेंपासून वेगळी केली आणि त्यामुळे उद्धव ठाकरेंकडे असलेल्या सेनेला राजकारणात उपहासाने शिल्लक सेना या नावाने संबोधले जावू लागले. एकेकाळी मोठमोठी क्रिडांगणे कमी पडेल इतकी अफाट गर्दी असणारे शिवसेनेचे मेळावे आता उद्धव ठाकरेंना बंदीस्त हॉलमध्ये घेण्याची वेळ आली आहे. दुपारचे कडक ऊन मान्य असले तरी सांयकाळी मेळावे घेण्यास हरकत नव्हती; परंतु आता पूर्वीसारखे वलय न राहिल्याने, दरारा न राहिल्याने आणि शिवसैनिकही न राहिल्याने 'झाकली मुठ सव्वा लाखांची' या उक्तीप्रमाणे हॉलमध्ये मेळावे घेऊन तीच तीन भाषणे, तेच तेच मुद्दे, तेच तेच आरोप यामुळे उद्धव ठाकरेंच्या मेळाव्यामध्ये नावीन्यही राहिलेले नाही. शिवसेनाप्रमुखांच्या मेळाव्यानंतर शिवसैनिकांना आदेश मिळायचा, एक नवीन विचार मिळायचा, सभेतून परतणाऱ्या शिवसैनिकांच्या चेहऱ्यावर एक तेज आणि नजरेमध्ये अंगार पाहावयास मिळत असे. पण आता हे सर्व इतिहासजमा झाले आहे. मुळातच असंगाशी संग केल्यावर परिणामाची किंमत मोजावी लागतेच, तेच आज उद्धव ठाकरेंच्या बाबतीत घडले आहे. पण संघटनेत मोठ्या प्रमाणावर पडझड होऊनही, शिवसेनेच्या मातब्बर सरदारांनी साथ सोडूनही त्यातून उद्धव ठाकरे कोणताही बोध घेण्यास तयार नाहीत आणि आपला हेकेखोरपणा सोडावयास तयार नाहीत. त्यामुळेच शिल्लक सेनेमध्ये आजही मोठ्या प्रमाणावर गळती सुरू आहे.

शिवसेना वाढली ती शिवसैनिकांच्या परिश्रमावर, शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेहनतीवर, शिवसेनेत असलेल्या तत्कालीन नेत्यांनी शहरी व ग्रामीण भागांत केल्यावर संघटना बांधणीवर. अर्थात या सर्व लोकांचे प्रेम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर होते. उद्धव ठाकरेंचे त्या काळात संघटना आणि संघटना बांधणीमध्ये काडीमात्रही योगदान नव्हते. ज्या नाशिक शहरातून शिवसेनेच्या महाअधिवेशनातून राजकीय सारीपाटावर उद्धव ठाकरेंचे संघटनात्मक पर्दापण झाले, अर्थात शिवसेना त्या काळात सर्वोच्च शिखराच्या दिशेने वाटचाल करत होते. अनेक राजकीय घटक उद्धव ठाकरेंचा भाषणातून उल्लेख 'आयत्या पिठावर




रेघोट्या मारणारा' असाच करतात. नाशिकच्या त्या महाअधिवेशनात संघटनात्मक पदावर खऱ्या अर्थाने राज ठाकरेंचा अधिकार होता, पण त्यांना डावलून तो अधिकार उद्धव ठाकरेंना देण्यात आला. २०१९ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना-भाजपा एकत्रितपणे निवडणूक लढली, पण भाजपाला स्ववळावर सत्ता मिळणे शक्य नसल्याचे लक्षात येताच काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी मुख्यमंत्रीपदासाठी सोबत केली. उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री पद मिळाले, पण शिवसेना संघटना मात्र त्यांना शिवसेना नेत्यांसह, पदाधिकाऱ्यांसह, शिवसैनिकांसह गमवावी लागली. वडिलांनी निर्माण केलेली, नावलौकीकास आणलेली संघटना पुत्राने केवळ मुख्यमंत्री पदासाठी गमावली, असा शिक्का उद्धव ठाकरेंवर लागला आहे. संघटनेची पडझड थांबविण्यासाठी, शिल्लक सेनेत राहिलेल्या उरल्यासुरल्या शिलेदारांना सांभाळण्यासाठी, शिवसैनिकांसाठी कोणतीही नवीन ठोस भूमिका उद्धव ठाकरे घेत नसल्याने मागील साडेतीन वर्षांच्या काळात उद्धव ठाकरेंच्या भाषणातही तोचतोचपणा पाहावयास मिळत आहे. विधानसभा निवडणुकीत उबाठा शिवसेनेने महाराष्ट्रीय जनतेचा जनाधार गमाविल्याने अवघे १५च आमदार त्यांचे निवडून आले आहेत. उलटपक्षी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या संख्याबळात पूर्वीच्या तुलनेत कमालीची वाढ झाली आहे. जनतेने एकनाथ शिंदेंचीच शिवसेना यावर एकप्रकारे मतपेटीतूनच शिक्कामोर्तब केले आहे. मुस्लीमधार्जिण्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी उद्धव ठाकरेंनी केलेली सोबत आजही शिवसैनिकांच्या व जनतेच्याही पचनी पडलेली नाही. त्यामुळे त्यांनी याचा संताप विधानसभा निवडणुकीत मतदानातून काढला आहे. गेली साडेतीन वर्षे तीच अर्थहीन भाषणे, कणाहिन नेतृत्व, विचारांचा, धोरणांचा अभाव, सर्व काही गमावूनही हेकेखोरपणाचा ताठपणा यामुळे उबाठांच्या शिल्लक सेनेमध्ये नजीकच्या काळात कोण शिल्लक राहील, हाच आज एक संशोधनाचा विषय आहे.

# वाघिरे हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांकडून RO प्रकल्प

**सासवड, पुणे (दै. आरंभ पर्व)**

"शाळा आपली आईसारखी आणि तिचं भलं करणं ही आपली जबाबदारी" या विचाराला वास्तवात उतरवत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या विघिरे हायस्कूल, सासवड येथील १९९३ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी एक अभूतपूर्व सामाजिक योगदान दिलं आहे.

या माजी विद्यार्थ्यांनी शाळेत RO जलशुद्धीकरण प्रकल्प उभारून आजच्या विद्यार्थ्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि थंड पाणी सतत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी घेतली आहे. ५०० लिटर प्रति तास क्षमतेच्या या युनिटमधून शेकडो विद्यार्थी दररोज पिण्याचे शुद्ध पाणी मिळवत आहेत.



सध्या तापमान झपाट्याने वाढत असताना, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प आशीर्वाद ठरला आहे. फक्त आर्थिक मदत नव्हे, तर एक भावनिक गुंतवणूक म्हणून या प्रकल्पाकडे पाहिलं जात आहे.

"या उपक्रमामुळे शाळेच्या उंबरठ्यावरून गेलेली एक पिढी पुन्हा शिक्षणाच्या सेवेत उभी राहिली आहे. हे खरंच प्रेरणादायक आहे," असं भावनिक उद्गार मुख्याध्यापक रामदासी सरांनी व्यक्त केले.

> **"पाण्याइतकं निर्मळ प्रेम" - हे वाक्य या उपक्रमात साक्षात अनुभवायला मिळालं. विघिरे हायस्कूलच्या १९९३ बॅचच्या विद्यार्थ्यांनी नातं तोडलं नाही, तर नव्याने जोडलं – शिक्षणसंस्थेशी, आपल्या बालपणीच्या आठवणींशी, आणि सर्वांत महत्त्वाचं – सामाजिक बांधिलकीशी.**
> **– किरण काळे, (समाजप्रेमी आणि शिक्षणप्रेमी)**

या संपूर्ण उपक्रमामागे कोणतीही सरकारी मदत नाही. प्रसिद्धीची अपेक्षा नसताना केवळ आपल्या शाळेबद्दलची कृतज्ञता आणि प्रेम यामुळे हा प्रकल्प साकार झाला आहे.

या प्रकल्पाने इतर शाळांनाही सशक्त संदेश दिला आहे की, प्रत्येक शाळेतील माजी विद्यार्थ्यांनी जर एकत्र येऊन आपल्या शाळेसाठी काही दिलं, तर त्या संस्था समाजघडणीची खरी केंद्रं बनू शकतात. RO प्रकल्पांपासून संगणक दालन, सौरऊर्जा, वृक्षारोपण, वाचनालय सुधारणांपर्यंत अनेक गोष्टींसाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्त्वाचा ठरू शकतो.




# डॉ. नंदा भोर यांचा पुरस्काराने सन्मान

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

दोंदे (ता.खेड) येथील भैरवनाथ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ नंदा विठ्ठल भोर यांना राज्यस्तरीय गुणवंत मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दापोली येथील कृषी विद्यापीठातील विश्वेश्वर सभागृहात राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम, कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

याप्रसंगी दोंदे शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नंदकुमार कोहिणकर, सहसचिव भरत उढाणे, विठ्ठल भोर सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी व सेवक उपस्थित होते.

# प्रतिक गंगणे यांना पुरस्कार जाहीर

- **KPM मीडिया तर्फे कार्यक्रमाचे आयोजन**
- **सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते होणार उद्योजकांचा सन्मान**
- **प्रतिक गंगणे यांच्या पत्रकारीतेतील योगदानाचे होणार कौतुक**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पत्रकारितेच्या क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दै. 'आरंभ पर्व'चे उपसंपादक मा. प्रतिक गंगणे यांना 'महाराष्ट्र उद्योग गौरव' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २० एप्रिल २०२५ रोजी पुण्यातील हिंजवडी येथे हा पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. पत्रकारितेतील योगदानाबद्दल हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

प्रसिद्ध मराठी सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रतिक गंगणे यांना प्रदान केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय दिपक (भाऊ) मानकर (मा. उपमहापौर, पुणे) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सकारात्मक घडामोडींना वाचा फोडणे आणि लोकशाहीला मजबुती देणारे कार्य प्रतिक गंगणे गेल्या काही वर्षांपासून करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.एएनआय, बिझनेस स्टँडर्ड, लोकमत टाइम्स, दै. आरंभ पर्व, प्रिंट, रेड कार्पेट हे या पुरस्कार सोहळ्याचे मीडिया पार्टनर असणार आहेत. या गौरवामुळे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नवोदित पत्रकारांना नवी प्रेरणा मिळेल, अशी भावना प्रतिक गंगणे यांनी व्यक्त केली.

# सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीतर्फे 'आशावादी भविष्यासाठी आरोग्यदायी प्रारंभ' संकल्पनेवर जागतिक आरोग्य दिवस साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीतर्फे (एसआयएचएससीओपी) 'आशावादी भविष्यासाठी आरोग्यदायी प्रारंभ' संकल्पनेवर जागतिक आरोग्य दिवस साजरा करण्यात आला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पसमध्ये व परिसरात विविध उपक्रमांतून आरोग्य दिवस साजरा झाला. कॅम्पसमध्ये 'फिट है तो, हिट है' हा उपक्रम राबविण्यात आला. तंदुरुस्तीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे उद्‌घाटन संस्थेच्या सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सिमी रेठरेकर यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी स्क्वॅट्स, प्लँक्स, पुश-अप्स, जम्प रोप आणि बर्पीज यांसारख्या फिटनेस



आव्हानांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. डॉ. अंजली शर्मा आणि डॉ. अंजली बैस होत्या यांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने या कार्यक्रमाचे समन्वयन केले. संस्थेचे मुख्य संचालक अधिकारी डॉ. रामचंद्रन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभाने या उत्सवाचा समारोप झाला. त्यांनी सातत्यपूर्ण आरोग्य सरावांचे महत्त्व अधोरेखित केले. 'जनजागृती आरोग्य शिबिर' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. भुकूम (ता. मुळशी) येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबिरात स्थानिक गरोदर महिलांना गर्भधारणेपूर्वी आणि नंतरच्या काळातील आरोग्यविषयक माहिती दिली गेली. मातृत्व आणि गर्भ आरोग्य विषयावर जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने डॉ. अमृता तोमर आणि डॉ. आकांक्षा वडोळकर यांच्या नेतृत्वात हे शिबीर झाले. या उपक्रमात आशिया शेख आणि मनीषा कांबळे यांच्या नेतृत्वात सूर्यदत्त कॉलेज ऑफ नर्सिंग अँड पॅरामेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. फिजियोथेरपीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी गर्भधारणेपूर्वीचे व्यायाम, मातृत्व काळातील आरोग्य, आणि सुरुवातीपासूनच आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचे महत्त्व यावर सत्र घेतले. डॉ. सीमा रेठरेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करत उपस्थितांशी संवाद साधला. आरोग्याबद्दलची जागरूकता लवकर वयातच सुरू झाली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. जागतिक आरोग्य दिनानिमित्त घेण्यात आलेला हा सर्वसमावेशक उपक्रम सूर्यदत्त संस्थेच्या वैयक्तिक तंदुरुस्ती आणि सामुदायिक आरोग्य जागरूकता वाढवण्याच्या कटिबद्धतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या उपक्रमाद्वारे निरोगी आणि आशावादी भविष्यासाठी भक्कम पाया घालण्याचा प्रयत्न करण्यात आला, असेही त्यांनी सांगितले.

# थोडक्यात

## ब्रह्मानंद बोयनेचे IIT, JEE निवड परीक्षेमध्ये यश



- **COGNIZANT हिंजवडी फेज या आयटी कंपनीतर्फे निवड परीक्षा संपन्न**

**धायरी (आरंभ पर्व) :** मनपा शाळा नऱ्हे चा इयत्ता सातवीचा विद्यार्थी ब्रह्मानंद संदीप बोयने याने COGNIZANT हिंजवडी फेज 3 या आयटी कंपनीने IIT, JEE च्या तयारीसाठी निवड परीक्षा घेतली होती. जगभरात 3 लाख Employee असलेली ही कंपनी पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहरातून आलेल्या 650 विद्यार्थ्यांमधून फक्त 50 विद्यार्थ्यांची निवड करतात. त्यात ब्रह्मानंद ची निवड झाली आहे. ही कंपनी या विद्यार्थ्यांचा performance मेन्टेन करून ठेवते व आठवी ते JEE, IIT पर्यंत ट्युशन, ट्युशन फी, कॉलेज selection ची तसेच प्लेसमेंट ची Responsibility घेते. तसेच Tab, Laptop सह इतर साहित्य सुद्धा पुरवते. आम्ही विद्यार्थ्यांना आयआयटी चे स्वप्न दाखवतो त्यामध्ये आज आम्हाला यश मिळाले असल्याची प्रतिक्रिया शिक्षकांनी व्यक्त केली. सहाय्यक प्रशासकीय अधिकारी श्री आवारी साहेब, पर्यवेक्षिका सौ वालकोळी मॅडम व डोळस मॅडम तसेच मनपा शाळा नऱ्हे चे मुख्याध्यापक श्री .माने सर व सर्व शिक्षक शिक्षिका या सर्वांनी ब्रह्मानंद चे अभिनंदन केले व वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.



## डी जे क्रिकेट अकॅडमीचे आ. रोहित पवार यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन

**पुणे (आरंभ पर्व) :** डी जे अकॅडमी सिंहगड इन्स्टिट्यूट वडगाव येथील मैदानावर पुण्यामध्ये सुरू होत आहे. भारतीय संघाचे माजी खेळाडू धीरज जाधव यांच्या वतीने डीजे अकॅडमी सुरू करण्यात आली आहे. या अगोदर बारामती येथील ग्राउंड वर ही अकॅडमी सुरू आहे त्याचबरोबर पुणे येथे डीजे अकॅडमी सुरू करण्यात आली आहे या अकॅडमीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे खेळाडूंची राहण्याची व्यवस्था देखील असणार आहे. विशेष म्हणजे खेळाडूंना शिक्षण घेत असताना क्रिकेट या खेळाचे उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. डी जे अकॅडमी व सिंहगड स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने धीरज जाधव यांच्या वतीने डी जे अकॅडमी सुरू करण्यात आली आहे .तिचे उद्‌घाटन महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. या भागातील अनेक क्रिकेट खेळाडूना याचा लाभ होईल असे मत महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. यावेळी धीरज जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.



## हनुमान जयंतीनिमित्त तुळशीच्या रोपांचे वाटप

- **ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्यातर्फे हनुमान जयंतीनिमित्त हजारो तुळशी रोपांचे वाटप!**

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे शहरात सर्वत्र हनुमान जयंतीचे औचित्य साधून विविध उपक्रम राबवण्यात आले. हिंगणे येथे ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने ॲड. प्रसन्नदादा जगताप जनसंपर्क कार्यालयात प्रभागातील माता भगिनी यांना तुळशीची हजारो रोपे भेट म्हणून देण्यात आली. यावेळी राहुलजी जगताप, राहुलजी जोशी, भाऊसाहेब निकम सोबतच इतरही मित्रपरिवार उपस्थित होते. प्रभागातील महिला भगिनींनी यावेळी गर्दी करत तुळशीचे रोप स्वीकारले व ॲड प्रसन्न दादा जगताप मित्र परिवाराचे आभार मानले.

## थोडक्यात



### ॲड .प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे बाबासाहेबांना अभिवादन

पुणे (आरंभ पर्व) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त ॲड. प्रसन्नदादा जगताप जनसंपर्क कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप, राहुलजी जगताप, राहुलजी जोशी, भाऊसाहेब निकम, सर्वज्ञ परदेशी सोबतइतरही मित्रपरिवार उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले. संघर्षात्मक परिस्थिती असतानाही स्वतः पुढे जाऊन समाजालाही पुढे नेण्याचे महान कार्य केले. कार्याचा संपूर्ण भारतीयांना कायमस्वरूपी अभिमान आहे. अशी भावना ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी बोलून दाखवली.



### महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड स्वारगेट आगार येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आगार व्यवस्थापक शैलेंद्रजी नाईक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी पाच विभाग प्रमुख माननीय विकास जी मते साहेब टाईम कीपर बाळासाहेब गावडे व कामगार वर्ग हरीष ओव्हाळ, तानाजी कांबळे,नंदू पाटील, आप्पा कदम, भाऊसाहेब दळवी,विशाल कदम, बाबूल नेटके, दादा कदम, सुनील रोकडे, अनिल रोकडे, बाबू आखाडे, बाळासाहेब पायगुडे इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पॅरागॉनने जिद, चलते रहने की नवीन मोहिम केली लाँच

पुणे (आरंभ पर्व) : पॅरागॉन 50 व्या वर्षामध्ये प्रवेश करत असताना भारतातील या सर्वात विश्वसनीय फूटवेअर ब्रँडने नवीन मोहिम लाँच केली आहे, जी ब्रँडचा मुलभूत विश्वास: 'जिद, चलते रहने की'ला दर्शवते. ही जाहिरात जीवनात शांतमय संकल्पासह पुढे जाणाऱ्या, त्यांच्या कुटुंबियांसाठी उज्वल भविष्याची आशा बाळगणाऱ्या भारतीयांच्या प्रेमळ उत्साहाला मानवंदना आहे. ब्रँड्सना वैशिष्ट्ये व किमतींसाठी ओळखले जाणाऱ्या काळामध्ये पॅरागॉन पॉज घेत अधिक मुलभूत बाब दाखवत आहे, ती म्हणजे प्रत्येक पावलामागील मानवी गाथा. सामान्य भारतीयांच्या वास्तवात रुजलेली ही मोहीम आपल्या मुलीचे चांगले भविष्य घडवण्यासाठी धडपडणाऱ्या वडिलांच्या दैनंदिन प्रयत्नांना सादर करते, ज्यामध्ये स्थिरता आणि प्रेमाचे भावनिक नाते दिसून येते. ही मोहिम पॅरागॉनला नव्या उंचीवर नेलेल्या व्यक्तींच्या जीवनात खोलवर रूजलेली आहे, असे पॅरागॉन फूटवेअरच्या मार्केटिंग अँड आयटीचे कार्यकारी उपाध्यक्ष सचिन जोसेफ म्हणाले. आम्ही 50 वर्षे पूर्ण करत असताना आमची शांत हिरोजचा, म्हणजेच दररोज उद्देश व स्थिरतेसह चालत राहणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याची इच्छा होती. ही जाहिरात त्यांच्या प्रवासाला सादर करते, तसेच या जाहिरातीमधून त्यांच्यासोबत चालण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते.

# मेडिकव्हर हॉस्पिटल तर्फे आधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणालीचा शुभारंभ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील नामवंत मेडिकव्हर हॉस्पिटल, पुणे यांनी आपल्या वैद्यकीय सेवांमध्ये आणखी एक मैलाचा दगड ठरवत अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणालीची सुरुवात केली आहे. या प्रणालीमुळे आता गुडघा बदल (क्नी रिप्लेसमेंट) यांसारख्या शस्त्रक्रिया अधिक अचूक, जलद आणि रुग्णासाठी सोयीस्कर होणार आहेत.

या शुभारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विलास लांडे (माजी आमदार), मा. आमदार श्री. महेश दादा लांडगे (भोसरी), श्री. विलास मडेगिरी (नगरसेवक, संबंधित प्रभाग) आणि मेडिकव्हर हॉस्पिटलचे रीजनल हेड श्री. नीरज पाल हे उपस्थित होते.

आमदार महेश दादा लांडगे म्हणाले, "पिंपरी-चिंचवडसारख्या गतिमान शहरात आरोग्यसेवा ही अधिक सुलभ, आधुनिक आणि विश्वासार्ह असावी, हीच आपली अपेक्षा असते. मेडिकव्हर हॉस्पिटलने ही अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू करून नागरिकांसाठी मोठं पाऊल उचललं आहे. या तंत्रज्ञानाचा फायदा परिसरातील अनेक रुग्णांना होईल, याची खात्री वाटते."

श्री. विलास मडेगिरी म्हणाले, "मेडिकव्हर सारख्या संस्थांमुळे आपल्या परिसरात दर्जेदार आणि प्रगत वैद्यकीय सुविधा सहज उपलब्ध होत आहेत. ही प्रणाली अनेक नागरिकांसाठी जीवन बदलणारी ठरणार आहे."

श्री. नीरज पाल (रीजनल हेड, मेडिकव्हर हॉस्पिटल) म्हणाले, "मेडिकव्हरचे ध्येय नेहमीच रुग्णकेंद्रित आणि तांत्रिक दृष्टिकोन ठेवून उपचार देणे हेच राहिले आहे. रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली ही केवळ तंत्रज्ञानाची जोड नाही, तर रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टीने एक नवे पर्व आहे. आमच्या पुणे युनिटमध्ये ही प्रणाली सुरु झाल्याचा आम्हाला अभिमान आहे."

नवीन रोबोटिक प्रणालीद्वारे शस्त्रक्रिया अचूकतेने आणि नियंत्रित पद्धतीने करता येते. शस्त्रक्रियेआधी संपूर्ण नियोजन करता येते, जेणेकरून प्रत्यक्ष शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित आणि यशस्वी होते. यामुळे रुग्णाला लवकर रिकव्हरी मिळते आणि शस्त्रक्रियेच्या दिवशीच रुग्ण चालू शकतो, ही या तंत्रज्ञानाची खासियत आहे.

ही प्रणाली सर्व प्रकारच्या गुडघा शस्त्रक्रियांमध्ये वापरता येते, ज्यात पारंपरिक गुडघा बदल, अर्धगुडघा शस्त्रक्रिया आणि कॉम्प्लेक्स केस देखील समाविष्ट आहेत.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. व्यास मौर्य म्हणाले, "ही रोबोटिक प्रणाली आमच्या रुग्णांसाठी अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. तिच्या साहाय्याने आम्ही आणखी अधिक अचूक आणि जलद सेवा देऊ शकू."

रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन डॉ. राहुल गागरे म्हणाले, "रोबोटिक तंत्रज्ञानामुळे आमच्या शस्त्रक्रिया अधिक अचूक होतात. रुग्णासाठी वेदना कमी होतात, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर घरी जाऊ शकतो. विशेष म्हणजे हा रोबोट संपूर्ण भारतीय बनावटीचा आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या नव्या प्रणालीमुळे आम्ही जागतिक दर्जाच्या शस्त्रक्रिया पुण्यात उपलब्ध करून देत आहोत."

## डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

भीमशक्ती संघटनेच्या वतीने एसटी महामंडळाच्या राज्यातील सर्व बसस्थानकांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा लावण्यात येईल. असे प्रतिपादन पुणे जिल्हा भिमशक्ती संघटनेचे अध्यक्ष तथा राजगुरूनगर बँकेचे संचालक विजय डोळस यांनी केले. राजगुरूनगर एसटी बसस्थानक येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती एसटी कर्मचाऱ्यांनी बसस्थानकावर उत्साहात साजरी केली. तसेच यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कौदरे, राजगुरूनगर बँकेचे जेष्ठ संचालक किरण आहेर, रेवणनाथ थिगळे, अनिल जाधव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, एसटी महामंडळ हे सर्वसामान्य प्रवाशांची सेवा करणारी संस्था आहे. अशा प्रवाशांना न्याय, समानता, शिक्षण, हक्क यांची प्रेरणा मिळावी. या उद्देशाने या प्रतिमा राज्यातील सर्व एसटी बस स्थानकांवर लावल्या जाणार आहेत. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुहीक बुद्धवंदना - प्रार्थना करण्यात आली. कार्यक्रमासाठी स्थानक प्रमुख उत्तम लांडे, वाहतूक निरीक्षक नासिर हवालदार, सहायक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, वाहतूक नियंत्रक नागेश्वर वैरागर, दत्तात्रय गभाले, एम.डी. शिंदे, अर्जुन वाघुले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन एसटी कर्मचारी मोहन गोपनारायण, शिवाजी खलुले, महादेव तुळसे आदी कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश्वर वैरागर यांनी केले.

## १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जनता दरबार संपन्न




**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, थेऊर ग्रामपंचायत सदस्य युवराज हिरामण काकडे यांनी, थेऊर येथे पहिल्यांदाच 'जनता दरबाराचे' आयोजन केले होते. "महाराष्ट्र शासन निर्णय संक्रीण / २०२५ / प्र / क्र. १७८ अंतर्गत" १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रमार्फत- जातीच्या दाखल्यांच्या नावांची यादी करणे, अर्जातील त्रुटींची पूर्तता करणे, नवीन अर्ज स्वीकारणे, ग्रामपंचायत अनुषंगिक कामे, कृषी विभाग, ऊर्जा (MSEB) विभाग, सामाजिक न्याय व महिला बालकल्याण अंतर्गत कामे, आरोग्य विषयक सल्ला व मार्गदर्शन अशा विविध विभागांमार्फत परिसरातील नागरिकांच्या शंकांचे निरसन करून, सेवासुविधा देण्यात आल्या. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे तसेच संविधान पुस्तिकेचे पुजन करून, कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या जनता दरबारामध्ये जवळपास २१७ गरजवंत नागरिकांनी लाभ घेतला. अप्पर तहसीलदार सौ. तृप्ती कोलते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

यावेळी मंडळ अधिकारी किशोर जाधव, तलाठी सौ.सरला पाटील, थेऊर ग्रामपंचायत अधिकारी तुकाराम पाटील,एम एस ई बीचे कनिष्ठ अभियंता सुधीर धाडगे, पंचायत समिती कृषी अधिकारी गजानन नारकर, कृषी सहाय्यक राजेंद्र भोसेकर, यांनी सेवा सुविधांबाबत विशेष सहकार्य केले.

तसेच हवेली पंचायत समितीचे माजी सदस्य हिरामण काकडे, काळूराम कांबळे, यशवंतचे मा.व्हाइस चेअरमन मोरेश्वर काळे, थेऊरचे मा.उपसरपंच दत्तात्रय कुंजीर, सदस्य राहुल कांबळे, गणेश रसाळ, सुखराज कुंजीर, दत्तात्रय कुंजीर, गोविंद तारु, संजय गावडे, विनोद माळी, मच्छिंद्र तारु, गणेश कुंजीर, नंदकुमार कुंजीर, लक्ष्मण कुंजीर, रूपचंद बोडके, रामचंद्र बोडके, मयुर कुंजीर, दिनेश कुंजीर, दिपक काकडे, संदीप काकडे, विलास काकडे, बाळासाहेब शेडगे, सचिन राऊत, किरण मेमाणे, रामदास चव्हाण, रायचंद जाधव, वसंत चव्हाण, सोमनाथ जाधव, सुमित सावंत, अजय जाधव आदी उपस्थित होते.

# मधुमेहावर 'आयुर डायबेट', तर रक्तदाबावर 'आयुर कार्ड' गुणकारी

### वैद्य नीरज कामठे यांचे मत; सोहम सिद्धतत्वमकडून दोन नव्या आयुर्वेदीय स्वरस औषधांची निर्मिती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मधुमेह व हृदयरोग यांसारख्या आजारांवर 'आयुर डायबेट' व 'आयुर कार्ड' स्वरस (ज्यूस) गुणकारी ठरेल. आयुर डायबेट स्वरसमुळे शरीरातील साखरेचे, तर आयुर कार्ड स्वरसमुळे रक्तदाबाचे व कोलेस्ट्रॉलचे प्रमाण संतुलित ठेवून हृदयाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल," असे मत आयुर्वेदाचार्य वैद्य नीरज कामठे यांनी व्यक्त केले.

सोहम सिद्धतत्वम संस्थेने निर्मिलेल्या 'आयुर डायबेट ज्यूस' व 'आयुर कार्ड ज्यूस' या दोन आयुर्वेदीय स्वरसाचे लोकार्पण बुधवारी संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात गणपती बाप्पांसमोर करण्यात आले. त्यावेळी वैद्य नीरज कामठे बोलत होते. प्रसंगी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, खजिनदार महेश सूर्यवंशी, डॉ. मेघश्री कामठे, सोहम सिद्धतत्वमचे संस्थापक शुभम मुंदडा, मनमोहन मंत्री व निलेश सारडा यांच्यासह शामसुंदर मुंदडा, जयंत बोधे, कृष्णा मालाणी, दीपाली तिकोने, श्वेता मंत्री, वैष्णवी मुंदडा आदी उपस्थित होते.

वैद्य नीरज कामठे पुढे म्हणाले की, "संशोधनाच्या आधार घेऊन आयुर्वेदात अनेक चांगली औषधे येत आहेत, याचा आनंद आहे. द्रवरूपात आणलेली ही औषधे लवकर शरीरात मिसळतात व प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. येणाऱ्या काळात ही औषधे मधुमेह व हृदयरोग यांसारख्या आजारांवर गुणकारी ठरतील. तीन तरुणांनी एकत्रित येत आयुर्वेदातील सिद्ध व तत्वनिष्ठ औषधांची निर्मिती करण्याचे हाती घेतलेले काम कौतुकास्पद आहे. आयुर्वेदामध्ये सर्व व्याधींवर उपचार शक्य असून, त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली, तर ते अधिक प्रभावी ठरेल."

महेश सूर्यवंशी म्हणाले, "आयुर्वेदीय औषधांच्या माध्यमातून मधुमेह आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यासाठी याचा उपयोग होईल. आज चतुर्थीच्या निमित्ताने बाप्पांच्या चरणी सादर झालेल्या या औषधांमुळे रुग्णांना नक्कीच दिलासा मिळेल, असा विश्वास वाटतो. बाप्पांच्या आशीर्वादाने सोहम सिद्धतत्वम आणखी चांगले काम करेल."

शुभम मुंदडा म्हणाले, "निलेश सारडा, मनमोहन मंत्री आणि मी शुभम मुंदडा आम्ही तिघांनी एकत्रितपणे अडीच वर्षांपूर्वी सोहम सिद्धतत्वम संस्थेची सुरुवात केली. प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य वैद्य सुकुमार सरदेशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत 'सोहम'मध्ये शुद्धता आणि आयुर्वेदीय परंपरा याची सांगड घालून समाजाच्या चांगल्या आरोग्यासाठी आयुर्वेदीय उत्पादने बनवत आहोत. दगडूशेठ गणपती बाप्पांच्या आशीर्वादाने आज ही दोन उत्पादने रुग्णांना उपलब्ध करत आहोत, याचा आनंद आहे. यासह आवळा ज्यूस, आवळा कंद, गुलकंद, पेनकेअर ऑइल, हेअर ऑइल, पचनामृत ज्यूस अशा विविध उत्पादनांचा लोकांना लाभ होत आहे. सोहम सिद्धतत्वमची स्वरस व गोळ्यांच्या स्वरूपातील औषधे जगभर पोहोचवण्यासाठी, सर्वांना आरोग्यदायी आयुष्य देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत."

आयुर्वेदातील प्राचीन परंपरा, वारसा याला आधुनिकतेची जोड देऊन गुणकारी औषधांची निर्मिती आम्ही करत असून, रुग्णांना याचा परिणामकारक व चांगला उपयोग होत आहे. रुग्णांना व्याधींपासून दिलासा देण्यात योगदान देता येतेय, तसेच आयुर्वेदाच्या प्रचार व प्रसार कार्यात सहभागी होत आहोत, याचा आनंद वाटत असल्याचे निलेश सारडा यांनी नमूद केले.

# मुंबईत 'रूफ इंडिया एक्स्पोचे आयोजन

- **भारतातील रूफिंग क्षेत्राची उलाढाल २०२५ पर्यंत ८.०८ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असून, दरवर्षी ६.५ टक्क्यांनी वाढत २०३० पर्यंत ती ११.०७ अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**
- **रिअल इस्टेट आणि बांधकाम क्षेत्रात होत असलेल्या झपाट्याने वाढीमुळे छप्पर, फरशी अशा सहाय्यक घटकांच्या क्षेत्रांनाही मोठी चालना मिळत आहे.**

Asia's Most Definitive Expo for Roofing & Allied Products ! 22nd Edition
ROOF INDIA EXHIBITION
24 - 26 APRIL 2025
Bombay Exhibition Centre
Mumbai, India

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत आणि इतर संबंधित क्षेत्रातील आघाडीच्या 'रूफ इंडिया' या प्रदर्शनाची २२ वी आवृत्ती २४ ते २६ एप्रिल २०२५ या कालावधीत मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (नेस्को), गोरेगाव (पूर्व) येथे आयोजित करण्यात येणार आहे. छपरासाठी लागणाऱ्या स्क्रूपासून ते संपूर्ण रूफिंग सोल्यूशन्सपर्यंत सर्व काही एकाच छताखाली मिळवून देणारे हे एकमेव व्यासपीठ आहे. या प्रदर्शनात रूफिंग, क्लॅडिंग, प्री-इंजिनिअर्ड बिल्डिंग्ज, मेटल बिल्डिंग सिस्टीम्स, टेन्साइल आर्किटेक्चर, ग्रीन रूफ्स/ रूफ लँडस्केपिंग, वॉटरप्रूफिंग, इन्सुलेशन, रूफिंग मशिनरी, रूफ फास्टनिंग सिस्टीम्स इ. क्षेत्रांतील व्यावसायिकांना नेटवर्किंग, ज्ञानवृद्धी आणि व्यवसायवाढीच्या संधी उपलब्ध होतील. या प्रदर्शनात भारत व परदेशातील २०० हून अधिक कंपन्या/ब्रॅण्ड्स सहभागी होणार असून यात सर्वाधिक नवीन उत्पादने सादर केली जातील आणि प्रात्यक्षिकेही पाहता येतील. १०,००० पेक्षा अधिक व्यावसायिक आणि ग्राहक या प्रदर्शनाला भेट देतील, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

पायाभूत सुविधांच्या विकासाला मिळालेली मोठी चालना आणि हवामानपूरक नव्या तंत्रज्ञानाचा विकास यामुळे भारतातील बांधकाम आणि इन्फ्रास्ट्रक्चर उद्योगाला नवे बळ मिळाले आहे. विमानतळांचे आधुनिकीकरण व नव्या विमानतळ प्रकल्प, वेअरहाउस, मेट्रो रेल्वे, नवीन हॉटेल्स, सर्व्हिस्ड अपार्टमेंट्स, रिसॉर्ट्स, इंडस्ट्रियल सिटी/पार्क्स, रिटेल मॉल, हायपरमार्केट्स, मल्टिप्लेक्स, इंटिग्रेटेड टाउनशिप्स हे आज भारतातील वेगाने वाढणाऱ्या बांधकाम व पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील चर्चेचे मुख्य मुद्दे ठरत आहेत.

या अनोख्या एक्स्पोचे आयोजक असलेल्या हाइव्ह इंडिया प्रा. लि.चे पोर्टफोलिओ डायरेक्टर गगन साहनी म्हणाले, गेल्या दोन दशकांपासून रूफ इंडिया हे एक्स्पो या क्षेत्राच्या वाढीसाठी अतुलनीय पाठबळ देत आहे. हा देशातील एकमेव असा कार्यक्रम आहे ज्याला आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (एईएसए), कन्स्ट्रक्शन फेडरेशन ऑफ इंडिया (सीएफआय), इंडिया इन्स्युलेशन फोरम (आयआयएफ), वॉटरप्रूफर्स असोसिएशन ऑफ इंडिया (डब्ल्यूएआय) आणि वर्ल्ड मेटल फोरम (डब्ल्यूएमएफ) यांसारख्या प्रमुख व्यापार संघटनांचा पाठींबा लाभला आहे.

या एक्स्पोच्या दरम्यान 'लेट्स टॉक रूफिंग', 'फ्लोरिंग आयडियाज' आणि 'इनोव्हेटिव्ह इन्फ्रास्ट्रक्चर' या संकल्पनांवर आधारित तीन दिवसीय मुक्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादामध्ये रूफिंग आणि फ्लोरिंग तंत्रज्ञानातील नवकल्पनांवर उद्योगातील जाणकार तज्ज्ञ सत्र घेणार आहेत. या उपक्रमामध्ये नव्या तंत्रज्ञानातील घडामोडी, बाजारातील उदयोन्मुख ट्रेंड्स आणि उत्पादनांमध्ये झालेली नवीन भर यावर सखोल चर्चा होणार आहे.

रूफ इंडियासोबत यंदा 'फ्लोर इंडिया'च्या पाचव्या पर्वाचे सहआयोजन करण्यात आले असून, हे इंडस्ट्रियल व कमर्शियल फ्लोरिंग क्षेत्रातील एक महत्त्वाचे एक्स्पो मानले जाते. या प्रदर्शनात औद्योगिक फ्लोरिंग मटेरियल्स व सिस्टीम्स, कमर्शियल फ्लोरिंग, फ्लोर मशिनरी, क्लिनिंग इक्विपमेंट आदींचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## थोडक्यात

### नऱ्हे परिसरातील पाणीप्रश्नाबाबत नऱ्हेकरांकडून बैठकीचे आयोजन



धायरी (आरंभ पर्व) : गेल्या अनेक दिवसापासून पुणे महानगरपालिकेतील समाविष्ट गावातील नागरिकांना भीषण पाणीटंचाई निर्माण होत आहे. तरीही आवश्यक अशी कार्यवाही होत नसल्यामुळे समस्त नऱ्हेकरांच्या वतीने नऱ्हे परिसरातील ज्वलंत पाणीप्रश्नाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २०/०४/२०२५ रोजी रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता सिल्वर पेटल बँक्वेट हॉल नऱ्हे रोड नारायण नवले शाळेसमोर पुणे येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ह्यामध्ये पाणीपुरवठा संबंधी चर्चा व प्रबोधन करण्यात येणार आहे. सर्व नऱ्हेकर, सोसायटी धारक, तरुण, वृद्ध, महिला यामध्ये उपस्थित राहणार आहेत. आपल्या हक्काचा लढा आपल्यालाच द्यावा लागणार आहे. ह्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन चर्चा व संवाद करूया असे आवाहन नऱ्हे करांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी केले आहे.

### गारपीटग्रस्त गावांची खासदार अमोल कोल्हे यांच्याकडून पाहणी

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : काल दुपारी अडीच वाजताच्या सुमारास जुन्नर तालुक्यातील जुन्नर व मढ महसूल मंडळातील २३ गावांमध्ये गारपीट आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पाहणी केली. तसेच तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज देण्याची मागणी केली. काल दुपारी अडीचच्या सुमारास अचानक जुन्नर महसूल मंडलातील पारुंडे, येणेरे, काले, दातखिळवाडी, बुचकेवाडी, काटेडे, विठ्ठलवाडी, गोळेगाव, आलदरे, पिंपळगाव सिद्धनाथ, गोद्रे, कुमशेत, आगर, सोमंतवाडी, पाडळी, बागायत बुद्रुक व खुर्द, हापुसबाग, बादशाह तलाव आणि जुन्नर येथे अतिवृष्टी झाली. तर मढ महसूल मंडलातील पारगाव तर्फे मढ, सितेवाडी, वाटखळे, बगाडवाडी या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर गारपीट आणि अतिवृष्टी झाली. या गारपीट व अतिवृष्टीमुळे बाधित गावांतील रब्बी पिकांपैकी कांदा, फळबाग/आंबा व इतर भाजीपाला आदी पिकांचे मोठे नुकसान झाले. त्याचबरोबर गोद्रे आणि कुसूर गावांतील घरांची कौलं आणि पत्रे उडाल्याने घरांचेही नुकसान झाले. या गारपीट आणि अतिवृष्टीची दखल घेऊन खासदार डॉ. कोल्हे यांनी तहसीलदार अनंथा गवारी, गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर, कृषी अधिकारी गणेश भोसले, मंडल अधिकारी, कृषी सहायक, तलाठी, ग्रामसेवक आदींसमवेत मढ महसूल मंडलातील वाटखळे, पांगरी गावाची पाहणी केली. यावेळी तुषार थोरात, अंकुशराव आमले, तुळशीराम भोईर, नितीन घोलप, ईश्वर घोलप, गोरक्षनाथ घोलप, सुनील घोलप, रवींद्र घोलप, शिवाजी घोलप, तुकाराम घोलप, कुशाभाऊ घोलप,सुनील दिघे, दत्तात्रय दिघे, विश्वनाथ घोलप, तुकाराम दिघे, मारुती दिघे, सखाराम घायवट, राम दिघे, शांताराम दिघे तसेच नुकसानग्रस्त शेतकरी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. या पाहणी दरम्यान खासदार डॉ. कोल्हे यांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी चर्चा करुन त्यांच्या नुकसानीचा आढावा घेतला. तसेच अतिवृष्टी व गारपीट झालेल्या गावातील पीकांच्या आणि घरांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत. तसेच पिकांच्या नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज देण्यासाठी प्रस्ताव राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश दिले.

### श्याम व आरती भुतडा एम. आय. जी.च्या अध्यक्षपदी निवड

पुणे (आरंभ पर्व) : महेश इंडस्ट्रियल ग्रुप (एम. आय. जी.) या प्रमुख स्वयंसेवी संस्थेच्या (एन. जी. ओ.) आगामी कार्यकालासाठी नवीन कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली. यामध्ये श्याम आणि आरती भुतडा यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नेहा आणि नीलेश लड्डड यांची उपाध्यक्ष, तर सागर आणि पूनम राठी यांची सचिव पदासाठी निवड झाली आहे. कोषाध्यक्षपदी उमेश आणि सरिता धूत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संचालक म्हणून दिनेश आणि शीतल मुंदडा, कुणाल आणि मेघा मंत्री, मनीष आणि श्वेता राठी, तसेच गौरव आणि श्रुती मुंदडा यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. कार्यकारिणीच्या या स्थापना समारंभास मुख्य अतिथी डॉ. श्रीकांत करवा आणि गेस्ट ऑफ ऑनर श्री सुरेश सोडानी यांची गौरवपूर्ण उपस्थिती लाभली. यावेळी महेश्वरी समाजाच्या विविध संस्थांचे वरिष्ठ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रमाची प्रतिष्ठा आणि वैभव अधिक वाढले.महेश इंडस्ट्रियल ग्रुप (एम. आय. जी.) ची स्थापना १९७७ साली झाली असून, ही संस्था महेश्वरी उद्योजकांच्या सामाजिक, आर्थिक व औद्योगिक विकासासाठी कार्यरत आहे.

# नराधमाला फाशीच्या शिक्षेच्या मागणीसाठी 'कॅन्डल मार्च'

**किरण खुडे**




**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील मांजरेवाडी ( धर्म ) येथे ११ एप्रिल रोजी अकरावीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न करून तिचा निघृण खून करणाऱ्या नवनाथ मांजरे (वय ३२) याला फाशीची शिक्षा द्यावी आणि खटला जलदगती न्यायालयात चालवावा, या मागणीसाठी राजगुरूनगर शहरात मंगळवारी (१५ एप्रिल) रात्री 'कॅन्डल मार्च' काढण्यात आला. या मोर्चात राजगुरुनगर आणि मांजरेवाडी परिसरातील महिला, युवती आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या घटनेने परिसरात प्रचंड संताप उसळला असून, पीडित मुलीला न्याय मिळावा, यासाठी एकजुटीने आवाज उठवण्यात आला. घटनेतील नराधम पोलीसांच्या ताब्यात आहे.

हा कॅन्डल मार्च येथील हुतात्मा स्मृती स्थळापासून उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयापर्यंत शांततापूर्ण मार्गाने काढण्यात आला. सहभागी नागरिकांनी हातात मेणबत्त्या घेऊन पीडित मुलीला श्रद्धांजली अर्पण केली.आणि तिच्यासाठी त्वरित न्यायाची मागणी केली. मोर्चात सामील झालेल्या महिलांनी अशा क्रूर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाईची आवश्यकता व्यक्त केली. "आम्हाला न्याय हवा आहे, अशा नराधमांना फाशी द्या," अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. मोर्चातील सहभागाने समाजातील संवेदनशीलता आणि एकजुटीचे दर्शन घडवले.

कॅन्डल मार्च नंतर उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांना नागरिकांनी निवेदन सादर केले. निवेदनात आरोपी नवनाथ मांजरे याला फाशीची शिक्षा देण्यासह या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवण्याची मागणी करण्यात आली. तसेच, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर उपाययोजना आणि गस्त वाढवण्याची मागणीही नोंदवण्यात आली. उपविभागीय अधिकाऱ्यांनी तपासाला गती देण्याचे आणि योग्य कारवाईचे आश्वासन यावेळी दिले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडित अल्पवयीन मुलगी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शिक्षण घेत होती. ११ इयत्तेची परीक्षा देऊन क्लाससाठी ती महाविद्यालयात नेहमीप्रमाणे येत होती. दि. ११ रोजी राजगुरुनगर येथे नेहमीप्रमाणे सकाळी महाविद्यालयात आली होती. सकाळी साडेअकराच्या सुमारास घरी जाण्यासाठी पाबळ रोड येथे थांबली असताना, आरोपी नवनाथ मांजरे तिथे आला. घरी यायचे का असे म्हणून पिडितेला दुचाकीवर बसविले. दरम्यान मला उसाच्या शेताला दोन पाण्याची बारी द्यायची आहे असे मुलीला सांगुन मांजरेवाडी पिंपळ, मलघेवाडी या रस्त्याने त्याच्या नदीकाठच्या ऊसाच्या शेतात नेले. आरोपीने पिडित मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. पिडितेने नकार दिल्यामुळे आरोपीने पीडित मुलीच्या डोक्यात शेतातील दगड उचलून टाकला. तिचा मृतदेह शेतालगतच असणाऱ्या भिमानदीच्या पात्रात दिडशे फुट आत ओढत नेऊन टाकला, अशी आरोपीने कबुली दिली.

रविवारी (दि. १३) पिडित मुलीच्या मोठ्या बहिणीचा साखरपुडा सोहळा गावातच होणार होता. त्यामुळे सर्व कुटुंब आनंदात होते. मात्र आदल्या दिवशीच छोट्या बहिणीचा खून झाल्यामुळे कुटुंबासह संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. आरोपी गावामधीलच असल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. गाव ते स्मशानभुमी पर्यंत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवला होता. यावेळी ग्रामस्थ व नातेवाईकांनी आरोपीला फाशी द्यावी. अशी मागणी पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांच्याकडे केली.


आरोपी घटना घडल्यानंतर बिनदिक्कपणे गावात हिंडत होता जसे काही घडलेच नाही. घटनेनंतर तो जऊळके (ता. खेड) येथे यात्रेला जाऊन आला. दुसऱ्या दिवशी सकाळी हनुमान जयंती निमित्त स्वःताच्या किराणा दुकानात नारळ विकत होता. तसेच माझ्या शेतात नदीलगत कोणीतरी बाईचा ओरडण्याचा आवाज आला आहे. मी घाबरून तिकडे गेलो नाही, असे गावात सांगत फिरत होता. असेही पोलीसांनी सांगितले.

या घटनेने समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मोर्चात सहभागी झालेल्या युवतींनी सांगितले की, "अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाल्याशिवाय समाजात बदल होणार नाही." स्थानिकांनी प्रशासनावर टीका करताना, मुलींच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली आहे. या कॅन्डल मार्चने राजगुरुनगरच्या नागरिकांच्या संवेदनशीलतेचे आणि एकजुटीचे दर्शन घडवले आहे.

या प्रकरणाचा तपास सध्या वेगाने सुरू आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्याचे काम हाती घेतले आहे. दरम्यान, नागरिकांनी प्रशासन आणि न्यायव्यवस्थेवर विश्वास व्यक्त करताना त्वरित आणि कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे. जलदगती न्यायालयात खटला चालवला गेल्यास पीडित कुटुंबाला लवकर न्याय मिळेल, असा विश्वास स्थानिकांनी व्यक्त केला.

## मंथन राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये जय भोसले राज्यात प्रथम

**लक्ष्मण साबळे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मंथन राज्यस्तरीय सामान्य परिक्षा 2025 नुकतीच घेण्यात आली होती . या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे.

ह्यामध्ये नारायणगावच्या श्रीमती सीताबाई केदारी बालक मंदिराच्या पहिलीचा विद्यार्थी जय सचिन भोसले त्याने नेत्र दीपक यश मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. ह्या राज्यस्तरीय शिष्यवृत्ती स्पर्धेमध्ये हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

त्यामध्ये दीडशे पैकी दीडशे मार्क मिळवत त्याने हे यश प्राप्त केले. त्याच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षा होत आहे. त्याला त्याच्या शिक्षिका सौ. अर्चना करंडे मॅडम,मुख्याधिपिका सौ. सुनिता पारखे मॅडम,आई सौ .मोनाली भोसले,वडील सचिन भोसले (Development officer) यांचे मार्गदर्शन लाभले. अत्यंत कमी वयामध्ये चांगल्या प्रकारचे यश प्राप्त केल्यामुळे त्यांचे विशेष कौतुक होत आहे. यशाला कोणतीही सीमा नसते तर त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणे आवश्यक असते. हेच यानिमित्त दिसून येत आहे.

## कचरा डेपोला विरोध करण्यासाठी प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील राजगुरुनगर नगरपरिषदेने प्रस्तावित केलेल्या टाकळकरवाडी व जऊळके खुर्द (ता. खेड) गावांच्या गायरान जमीनीवरील कचरा डेपोसाठी गावच्या स्थानिक ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून या कचरा डेपोच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी मंगळवारी ( दि.१५) येथील प्रांताधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

टाकळकरवाडीचा गट नं.६ (जुना ३८) या भैरवनाथ देवस्थानच्या ठाण्याशेजारील गायरान जमिनीवर हा कचरा डेपो प्रस्तावित आहे. यासाठी दोन्ही गावच्या ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे. यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी गुरुवारी (दि.१०) ग्रामसभा घेऊन प्रखर विरोध केला. व त्यानुसार या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्च्यात अबालवृद्धांसह महिलांचाही सहभाग होता.

येथील एसटी बसस्थानकावरील हुतात्मा राजगुरुंच्या स्मृतीशिल्पाला हार घालून मोर्चाची सुरुवात झाली. यावेळी कचरा डेपोला विरोध करणाऱ्या घोषणा देण्यात आल्या. हा मोर्चा वाडा रस्त्यावरील प्रांताधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. तेथे मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. यावेळी स्थानिक ग्रामस्थांनी कचरा डेपोला विरोध दर्शविणारी भाषणे केली.

यावेळी आंदोलकांनी आपल्या भाषणात, जर या कचरा डेपोला आपण सर्वांनी एकजुटीने विरोध न केल्यास संपूर्ण कालवा व आसपासच्या विहिरींतील पाणी दुषित होऊन आरोग्यास हानीकारक ठरेल. व अनेक रोगांना आमंत्रण मिळेल, शेजारीच भैरवनाथ देवस्थान असल्याने दुर्गंधीमुळे देवस्थानचे पावित्र्य नष्ट होईल, टाकळकरवाडी व परिसरातील सर्व स्थावर मालमत्तांचे व जमिनींचे दर घसरतील व भविष्यात आपल्याकडे कोणत्याही प्रकारची विकासकामे होऊ शकणार नाहीत, वारंवार कचरा पेटवून निर्माण होणाऱ्या सततच्या धुरामुळे पिकांवर, माणसांवर व जनावरांवर त्याचे वाईट परिणाम होतील, कचऱ्याच्या गाड्यांची गावातून सारखी ये-जा सुरु होईल. हा कचरा रस्त्यांवर पडत राहील. व सततच्या वाहतुकीमुळे गावातही दुर्गंधी पसरेल.

## दोडकेंची मध्यस्थी : शाळा पूर्वपदावर विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा!

**प्रतिक गंगणे**

### कर्मचाऱ्यांचे पगार व्हावेत, विद्यार्थ्यांचेही नुकसान नको: सचिन दोडके



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे येथील आर. एम. डी. सिंहगड कॉलेज येथील कर्मचारी, शिक्षक व बसचालक यांनी थकीत वेतनासाठी काम बंद आंदोलन केले आहे.अनेक दिवसापासून थकित पगार नसल्यानं कर्मचारी हैराण झाले आहेत.

सदर कर्मचाऱ्यांनी आज आंदोलन करून विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास अडवणूक केली. त्यामुळं काही काळ येथील वातावरण बिघडले होते.

याची माहिती मिळताच कर्तव्यदक्ष नेते म्हणून ओळख असलेले, माजी नगरसेवक सचिन दोडके यांनी सदर माहिती घेऊन तात्काळ कर्मचाऱ्यांसोबत व प्रशासनासोबत चर्चा केली.

विद्यार्थ्यांचे कुठले प्रकारचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून दोडके यांनी प्रशासन, संस्थेतील कर्मचारी आणि पालक वर्गाशी साधक-बाधक चर्चा केली.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होता कामा नये मात्र कर्मचाऱ्यांचेही पगार व्हावे अशी भावना श्री .दोडके यांनी व्यक्त केली.त्यावर पुढील काही दिवसात सर्व कर्मचाऱ्यांचे पगार करण्यात येतील असा शब्द मॅनेजमेंटकडून देण्यात आला.

त्यानंतर आता शाळा नियमित सुरू करण्यात आली आहे. ह्यामुळे पालकाचे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी मॅनेजमेंट, कर्मचारी व पालक उपस्थित होते.

# महिलांनी स्वावलंबी व्हायला हवं : भूपेंद्र मोरे

## विश्वकर्मा विद्यापीठात जागतिक अर्थशास्त्र दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

महिलांनी स्वावलंबी होऊन स्वतःच्या पायावर उभारावे असे मत सामाजिक कार्यकर्ते श्री भूपेंद्र मोरे यांनी व्यक्त केले.

विश्वकर्मा विद्यापीठ, कोंढवा पुणे इथे अर्थशास्त्र विषयक जागतीक अर्थशास्त्र दिनाचा कार्यक्रम 15 एप्रिल 2025 रोजी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते श्री.भूपेंद्र मोरे उपस्थित होते. त्यांनी आपले मत व्यक्त केले.

यावेळी त्यांनी बचत गट विषयक माहिती विद्यार्थ्यांना दिली. अनेक प्रापंचिक, आर्थिक समस्यांना तोंड देणाऱ्या महिलांना स्वप्नपूर्ती महिला फाऊंडेशन मार्फत कसं सक्षम केलं जातं याचा प्रवासाचा उलगडा त्यांनी केला.

विद्यार्थ्यांना बचत गटाची राष्ट्राच्या अर्थकारणावर असलेली व्याप्ती व सहभाग व येणाऱ्या अडचणी या विषयी श्री.भूपेंद्र मोरे यांनी सविस्तर माहिती दिली.

यावेळी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या सौ. नेहाताई मोरे यांनी बचत गट सुरु करण्याची प्रक्रिया, त्याला लागणारी दस्त ऐवज व सरकारमान्य बचत गट करण्यासाठी लागणारी प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजावुन सांगितले. यावेळी सौ .सोनाली नायर यांनीही विवीध सरकारी कामाची माहिती तेथील सफाई कर्मचाऱ्यांना दिली.

या कार्यक्रमात सरकारी विविध योजनांची माहिती,प्रश्नमंजुषा व अर्थकारणावर आधारीत चित्रपट दाखवण्यात आला.

या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते श्री .भूपेंद्र मोरे, सौ नेहाताई मोरे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अमोल कांबळे,

सहाय्यक प्राध्यापक,प्रा अंकिता सांगळे-सरकार, संचालक, महिला सक्षमीकरण विभाग

संचालक प्रा. पशमीना शहा ,सौ.सोनाली नायर,

तसेच विश्वकर्मा विद्यापीठ, अर्थशास्त्र तसेच व्यवस्थापन व अन्य विभागातील अनेक विद्यार्थी उपस्थित होते.



दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.